MAHBIL03429/13/1/2000-TC     खाजगी वितरणासाठी     वर्ष: दहावे । अंक दहावा । फेब्रुवारी, २०११

# CIDCO Nirmiti

A NEWSLETTER


01 नगर विकास राज्यमंत्री मा.ना.श्री. भास्कर जाधव यांची सिडकोच्या प्रकल्पांना भेट


03 सिडको भवनात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा


04 CIDCO's participation at the 9th Pravasi Bharatiya Divas (PBD) Convention at New Delhi


05 सिडको महामंडळाच्या विविध प्रकल्पांची परिपूर्ण माहिती असलेली आकर्षक दिनदर्शिका व दैनंदिनी प्रकाशित

## नगर विकास राज्यमंत्री मा.ना. श्री. भास्कर जाधव यांची सिडकोच्या विविध प्रकल्पांना भेट

'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीच्या संदर्भात येथील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करताना त्यांचे संपूर्णपणे समाधान होईल, अशा प्रकारचे पुनर्वसन आणि पुन:स्थापना धोरण अवलंबिण्यात येईल, त्याचप्रमाणे या प्रकल्पग्रस्तांचे १२.५ टक्के भूखंड वाटपाबाबतचे अधिकारही अबाधित राहतील,' अशी ग्वाही नगरविकास राज्यमंत्री **मा.ना.श्री. भास्कर जाधव** यांनी पत्रकारांशी वार्तालाप करताना दिली.

**दि. १७ जानेवारी, २०११ रोजी मा. ना. श्री. भास्कर जाधव** यांनी नवी मुंबईच्या विविध प्रकल्पास भेट दिली त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. याप्रसंगी सिडकोचे अध्यक्ष **मा.श्री. नकुल पाटील,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

नवी मुंबईतील विविध प्रकल्पांना भेट देऊन त्यांची सद्यस्थिती जाणून घ्यावी, तसेच सिडकोच्या कार्यप्रणाली बाबतची सविस्तर माहिती जाणून घेण्याच्या उद्देशाने आज आपण नवी मुंबईस भेट देत आहोत. नवी मुंबई विमानतळ लवकरात लवकर आकारास यावे, शिवाय येथून स्थलांतरित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचीही योग्य काळजी घेतली जावी या अनुषंगाने सिडको आणि शासनस्तरावर योग्य निर्णय घेतले जातील, असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले, सिडकोने मागील ४० वर्षांत नगरनियोजन आणि विकासासंदर्भातील उल्लेखनीय प्रकल्पांची निर्मिती केली आणि त्यामुळेच या शहराची आज वेगळी ख्याती आहे. सिडकोच्या विविध क्षेत्रांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांची वैशिष्ट्ये आणि तज्ज्ञता या प्रकल्पाच्या माध्यमातून जाणवते. १९७० साली केवळ १.१७ लक्ष लोकसंख्या असणारा हा परिसर आज १८ लक्ष लोकांचे निवासस्थान आहे. येथील सोयी-सुविधा विशेषत: पायाभूत, भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सुविधांबाबत येथील रहिवाशी समाधानी आहेत हेच सिडकोच्या यशाचे खरे गमक आहे.

**आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, उन्नती गृहनिर्माण योजना, गोल्फ कोर्स, सेंट्रल पार्क, आगरी कोळी संस्कृती भवन** आणि **एक्झिबिशन सेंटर** या प्रकल्पांना श्री. भास्कर जाधव यांनी भेटी दिल्या. या प्रकल्पांच्या विकासासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती जाणून घेतली आणि प्रकल्प पूर्णत्वाच्या दृष्टीकोनातून सुयोग्य सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी सिडकोचे संचालक **मा. श्री. सुभाष भोईर, मा. श्री. नामदेव भगत,**



# सिडको






















सिडको कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल,** सिडकोचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

१७ जानेवारी, २०११ रोजी सकाळी सिडको भवन येथे समिती कक्षात सिडकोच्या विभाग प्रमुखांशी विविध प्रकल्पांबाबत चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रारंभी **मा.ना. श्री. भास्कर जाधव** यांचे स्वागत करण्यात आले.

सिडकोचे अध्यक्ष **श्री. नकुल पाटील, संचालक श्री. सुभाष भोईर, श्री. नामदेव भगत** यांनी प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के भूखंडाचे वाटप, गरजेपोटी बांधलेल्या घरांचे प्रश्न याविषयी मा. मंत्रिमहोदयांशी चर्चा केली. व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांनी प्रकल्पांच्या सद्यस्थिती बाबत विस्तृत विवरण विषद केले. सिडकोच्या गेल्या ४० वर्षातील विविध प्रकल्प आणि विकसनशिल प्रकल्पांविषयी माहिती देणारे सादरीकरण मुख्य नियोजक **श्री. एम. डी. लेले** यांनी केले.

# सिडको भवनात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनात भारताचा **६१वा प्रजासत्ताक दिन गुरुवार, दि. २६ जानेवारी २०११** रोजी उत्साहात साजरा करण्यत आला. सिडकोचे अध्यक्ष **मा.श्री. नकुल पाटील** यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांची प्रमुख उपस्थिती होती. सिडको सुरक्षा दल आणि अग्निशमन दलाच्या शिस्तबद्ध संचालनात राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. या ध्वजारोहण सोहळ्यात सिडकोचे विभाग प्रमुख तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांनीही उत्साहाने भाग घेतला.

### नवीन औरंगाबाद येथे प्रजासत्ताक दिन साजरा

सिडको कार्यालय, उद्योग भवन, नवीन औरंगाबाद येथेही **६१व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त** सिडकोचे मुख्य प्रशासक (नवीन शहरे) **श्री. पांडुरंग कुलकर्णी** यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.






यावेळी अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सिडकोच्या वाळूज महानगर येथील कार्यालयातही सहा. पणन अधिकारी **श्री. दिलीप गणोरे** यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी वाळूज कार्यालयातील अधिकारी-कर्मचारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# CIDCO's participation at the 9th Pravasi Bharatiya Divas (PBD) Convention at New Delhi

CIDCO participated at the **9th Pravasi Bharatiya Divas (PBD) Convention** held during **7th-9th January, 2011** at **Vigyan Bhavan, New Delhi.** The Convention was organized by the **Ministry of Overseas Indian Affairs (MOIA),** in partnership with the **Ministry of Development of North Eastern Region,** along with eight **North Eastern States** and the **Confederation of Indian Industry (CII).**




**Shri Manmohan Singh,** Prime Minister of India, inaugurated the Convention on **8th January, 2011** and **Her Excellency Smt. Pratibha Devisingh Patil,** President of India, presented the **Pravasi Bharatiya Samman Awards 2011** to distinguished PIOs / NRIs and delivered the Valedictory Address on **9th January, 2011.**

The participation of Ministry of Development of North Eastern Region and eight North Eastern States as partner was the special feature of the PBD-2011. However, the focus of the Convention was on the young overseas Indian. A plenary session on 'Engaging with the young overseas Indian' was held in an endeavour to connect with and engage the younger generation of the overseas Indians with emerging India.

PBD Conventions provide a platform for exchange of views and networking to overseas Indians on matters of common interest and concern to them. They also help the Government of India to better understand and appreciate the expectations of the overseas Indian community from the land of their ancestors and more importantly, acknowledge the important role played by them in India's efforts to acquire its rightful place in the comity of nations.




Consultations at earlier PBDs have led to the formulation of the Overseas Citizenship of India scheme, establishment of Overseas Indian Facilitation Centre, conceptualization of Pravasi Bharatiya Kendra, formation of Prime Minister's Global Advisory Council of people of Indian Origin, setting up of the India Development Foundation, and the launching of the Global Indian Network of Knowledge.



CIDCO has also participated in the Pravasi Bhartiya Divas Convention held from 7th-9th January, 2011 at Vigyan Bhavan, New Delhi, organised by the Ministry of Overseas Indian Affairs in partnership with the Ministry of Development of North Eastern Region, along with eight North Eastern states and the Confederation of Indian Industry.

**Shri M. D. Lele,** Chief Planner, **Dr. Dilip Watane,** Public Relations Officer and **Shri Rajendra Sawant** represented CIDCO at this exhibition.

Dy. Chief Minister of Bihar **Shri Sushil Kumar Modi** & Industrial Minister **Dr. Renu Kumari Kushwaha** also visited the CIDCO Stall.



# सिडको महामंडळाच्या विविध प्रकल्पांची परिपूर्ण माहिती असलेली आकर्षक दिनदर्शिका व दैनंदिनी प्रकाशित

सिडको महामंडळाच्या सन २०११ दिनदर्शिकेचे आणि दैनंदिनीचे प्रकाशन दिनांक १० जानेवारी, २०११ रोजी सिडकोच्या निर्मल, नरिमन पॉइंट येथील नोंदणीकृत कार्यालयात सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत सिडकोचे अध्यक्ष **मा.श्री.नकुल पाटील** यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव **श्री. टी. सी. बेंजामीन,** सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री.तानाजी सत्रे,** कोकण विभागीय आयुक्त **श्री.एस.एस.संधू,** सिडकोचे संचालक तथा विधान परिषदेचे आमदार **मा.श्री.सुभाष भोईर,** संचालक, **मा.श्री.नामदेव भगत** आणि कंपनी सचिव **श्री. प्रदीप रथ** यांची प्रमुख उपस्थिती होती.

सिडकोच्या सदर दिनदर्शिका व दैनंदिनी निर्मितीकरिता व्यवस्थापकीय संचालक **श्री.तानाजी सत्रे** यांच्या आदेशानुसार सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या समितीचे गठण करण्यात आले होते. त्या समितीत मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे **श्री. सुमंत भांगे,** मुख्य नियोजक **श्री. एम. डी. लेले,** मुख्य सामाजिक सेवा अधिकारी **श्रीमती. रिमा दीक्षित** आणि जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे** यांचा समावेश होता.व्यवस्थापकीय संचालक **मा. श्री. तानाजी सत्रे** यांच्या मार्गदर्शनानुसार समितीतील सदस्यांनी दिनदर्शिका व दैनंदिनीस अंतिम स्वरूप दिले आहे. यावेळी जनसंपर्क अधिकारी **डॉ.दिलीप वाटाणे** यांनी २०११च्या दैनंदिनी आणि दिनदर्शिकेबाबत माहिती दिली. २०११च्या दिनदर्शिकेत सिडको महामंडळाचे नवी मुंबईतील मुख्यालय सिडको भवन, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जुईनगर





पादचारी पुल, वाशी खाडी रेल्वे पुल, नेरुळ येथील सीवूडस इस्टेट, वाशी येथील इंटरनॅशनल इन्फोटेक् पार्क, खारघर येथील उत्सव चौक, सेंट्रल पार्क, नेरुळ येथील आगरी-कोळी भवन, सी.बी.डी., बेलापूर येथील अर्बन हाट, नवीन औरंगाबाद येथील सिडको नाटयगृह यांबरोबरच नवी मुंबईतील विविध प्रकल्पांसह पायाभूत, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक सोयी सुविधांबद्दल छायाचित्रांसह माहितीचा मागोवा दिनदर्शिकेत घेण्यात आला आहे. दैनंदिनीत सिडकोच्या विविध प्रकल्पांसंदर्भातील छायाचित्रासह माहिती तसेच सिडकोच्या विविध विभागांचे व अधिकारी वर्गाचे दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक देण्यात आले आहेत. सिडको महामंडळाच्या नवीन शहरांबरोबरच तेथे कार्यरत असणारे अधिकारी, महाराष्ट्र शासनाची विविध कार्यालये व शासकीय अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक या दैनंदिनीत समाविष्ट आहेत. महामंडळाने प्रथमच केलेल्या या दैनंदिनी आणि दिनदर्शिकेची संकल्पना आणि रचना जनसंपर्क अधिकारी **डॉ. मोहन निनावे** यांची असून सॅटेलाईट इलेक्ट्रॉनिक स्टुडीओच्या सहकार्याने तयार करण्यात आली आहे. सिडकोच्या दैनंदिनीचे व दिनदर्शिकेचे सर्वांनी कौतुक केले.

# विमानतळ प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के भूखंडांच्या वाटपाकरिता सिडकोची विशेष मोहीम

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या अंतर्गत येणाऱ्या गावांतील प्रकल्पग्रस्तांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के योजनेअंतर्गत द्यावयाच्या भूखंड वाटपाकरिता भूमी व भूमापन विभागातर्फे विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**दि.२२ डिसेंबर २०१०** रोजी प्रकल्पबाधित कृती समितीच्या बैठकीत ही विशेष मोहीम प्राधान्याने राबवून वाटपाची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करण्याचा निर्णय व्यवस्थापकीय संचालक **श्री. तानाजी सत्रे** यांनी जाहीर केला होता. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रात येणाऱ्या कोंबडभुजे, तरघर, उलवे, गणेशपुरी, वाघिवली वाडा, ओवळे (मुळगाव) कोली, कोपर आणि चिंचपाडा या १० गावांतील पूर्वी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात १२.५ टक्के भूखंड वाटप करण्यात आलेले नाही, त्या प्रकल्पग्रस्तांकरिता या विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता तीन स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली असून, त्यात ३ सहाय्यक भूमी व भूमापन अधिकारी आणि १० कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. बैठकीनंतर सुरु केलेल्या कार्यवाहीत आतापर्यंत १०० प्रकरणांची प्रक्रिया सुरू केली असून, ३० प्रकरणात वाटपपत्रेही देण्यात आली आहेत, तर करंजाडे, वडघर आणि चिंचपाडा येथील १४० भागधारकांना इरादापत्र देण्यात आले आहे.

या मोहिमेतंर्गत द्यावयाची इरादापत्रे व वाटपपत्रे व भाडेपट्टा करारनाम्याच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांनी त्यांची आवश्यक कागदपत्रे व वारस दाखले मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, सिडको भवन, भूमी व भूमापन विभाग, ७ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे त्वरीत सादर करून विशेष मोहीम जलदगतीने राबविण्यास सहकार्य करावे, असे आवाहन सिडको प्रशासनातर्फे करण्यात आले होते.

# सिडकोची अनधिकृत बांधकामविरोधात जोरदार मोहीम

सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाने अनधिकृत बांधकामाविरोधात हाती घेतलेल्या अतिक्रमण निष्कासनाच्या मोहिमेअंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोड्समधील अनधिकृत बांधकामांवर धडक कार्यवाही केली. सिडकोचे मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे **श्री. सुमंत भांगे** यांच्या मार्गदर्शनाखाली ११ जानेवारी ते २१



जानेवारी २०११ दरम्यान **कामोठे, खारघर, पनवेल, वाशी गाव, ऐरोली, पागोटे- उरण- द्रोणागिरी** येथील मोठ्या प्रमाणातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

या कार्यवाहीत, दि. ११ जानेवारी २०११ रोजी कोमोठे नोडमधील सेक्टर ६, ६ए, १४, दि १२ जानेवारी २०११ रोजी खारघर, दि. १३ जानेवारी २०११ रोजी पनवेल रेल्वे स्थानकाचा परिसर, दि. १८ जानेवारी २०११ रोजी वाशी गाव, दि. १९ जानेवारी २०११ रोजी ऐरोली येथील देशमुखवाडी आणि दि. २१ जानेवारी २०११ रोजी पागोटे, उरण आणि द्रोणागिरी येथील मोठ्या प्रमाणातील अनधिकृत बांधकामे नि:ष्कासित करण्यांत आली. सदर कार्यवाहीसाठी मोठ्या स्वरूपात पोर्कलेन यंत्र, जेसीबी यंत्र, ट्रक्स, शेकडो मजूर, गॅसकटर आणि कारवाईदरम्यानच्या वाहतुकीसाठी अनेक जीप्स यांसारख्या यंत्रणेचा वापर करण्यात आला. तसेच कार्यवाहीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये यांकरिता सिडको सुरक्षा दल व नवी मुंबई पोलीस दलातील अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांची जय्यत तयारी ठेवण्यात आली होती. या मोहिमेत मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे **श्री. सुमंत भांगे** यांच्या नेतृत्त्वाखाली नियंत्रक, अनधिकृत बांधकामे **श्री. बी.डी. कांकड, श्री. सुभाष गोसावी, आरेखक श्री. हेमंत बोडके, श्री. गुडेकर, श्री. जयंत पवार, श्री. देवकर, श्री. आंबर्डेकर, श्री. जावणे, श्री. गुडेकर, श्री. वैती, श्री. डायस, श्री. रावसाहेब देवकर, श्री. डी.जी. कोळी** तसेच सिडको सुरक्षा दलाचे सहा. सुरक्षा अधिकारी **श्री. सुरवसे** व त्यांच्या सहकाऱ्यांनी योगदान दिले.











# सिडकोतर्फे अर्बन हाट येथे दहा दिवसांचा 'मकर संक्रांत मेळा' संपन्न

सिडकोतर्फे दिनांक ८ जानेवारी ते १७ जानेवारी २०११ दरम्यान अर्बन हाट, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे **'मकर संक्रांत मेळ्याचे'** आयोजन करण्यात आले होते. मकर संक्रांत मेळ्याचे मुख्य आकर्षण ठरलेल्या महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध पैठणी साड्यांबरोबरच तामिळनाडू, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल येथील रेशीम व कॉटनच्या साड्या, ड्रेस मटेरिअल्स, ज्यूटच्या उत्पादनांबरोबरच हॅंडबॅग्ज, विविध कलाकुसरीच्या जरीकाम केलेल्या पर्स व विविध राज्यातील बचत गटांच्या दर्जेदार उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री प्रदर्शनादरम्यान करण्यात आली. कलाकृतींच्या प्रदर्शनाबरोबरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हस्ताक्षर सुधारण्याच्या पद्धतींचे प्रात्यक्षिकेही या मेळ्याचे खास आकर्षण ठरले. तसेच फूड प्लाझामध्ये पंजाबी पाककृतींबरोबरच विविध राज्यांची खासियत असलेले खाद्यपदार्थ तसेच ॲम्फिथिएटरमध्ये शनिवार व रविवार सायंकाळी ७.३० ते रात्री ९.०० दरम्यान करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक समारंभांनाही नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिला.

## सिडको प्रकल्पग्रस्त प्रशिक्षण संस्थेत क्रीडा महोत्सव तसेच स्नेहसंमेलनाचे यशस्वी आयोजन

सिडको प्रकल्पग्रस्त प्रशिक्षण केंद्रातर्फे दि. १४ जानेवारी २०११ रोजी आयोजित क्रीडा महोत्सव तसेच स्नेहसंमेलन यशस्वीरित्या संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणे या भूमिकेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमांस विद्यार्थी वर्गाचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या क्रीडा महोत्सव तसेच स्नेहसंमेलनाकरिता अध्यक्ष म्हणून सिडकोचे कंपनी सचिव **श्री. प्रदीप रथ** यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून बँक ऑफ इंडियाच्या शाखा अधिकारी **श्रीमती अनिता देवी,** सिडको प्रशिक्षण केंद्राचे प्रकल्प समन्वयक **श्री. ए. एन. सुर्वे,** सहाय्यक प्रकल्प अधिकारी **श्री. प्रमोद पाटील** यांनीही या समारंभास उपस्थिती दिली. प्रशिक्षण केंद्राच्या सर्व अभ्यास शाखेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये भाग घेऊन आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. क्रीडा महोत्सवात बॅडमिंटन, कॅरम, बुद्धिबळ, क्रिकेट तसेच चमचा-लिंबू असे अनेक क्रीडाप्रकारांचा समावेश होता.

या महोत्सवाला सिडकोचे अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी आणि पालकांची मोठी उपस्थिती होती.







## अभिनंदन



सिडकोचे कंपनी सचिव **श्री. प्रदीप रथ** यांनी रघुनाथ विहार आर्मी वेल्फेअर सोसायटी, खारघर यांच्या विद्यमाने आयोजित बॅडमिंटन डबल्स चँम्पियनशीप-२०१०-११चे विजेतेपद पटकावले.

## नवीन औरंगाबाद येथील श्री. गजानन साटोटे यांचा सत्कार



सिडको, नवीन औरंगाबाद येथील कार्यालयीन सहाय्यक **श्री. गजानन साटोटे** यांचा औरंगाबादचे पोलीस आयुक्त **श्री. श्रीकांत सावरकर** यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला.

यावेळी विभागीय **आयुक्त श्री. भास्कर मुंढे,** जिल्हाधिकारी **श्री. कुणाल कुमार,** पोलीस अधिक्षक (ग्रामीण) **श्री. मनोज लोहीया** व इतर मान्यवरांची उपस्थिती होती. मतदान प्रक्रियेतील छायाचित्र गोळा करणे व मतदारांशी प्रत्यक्ष संपर्क साधणे यात संपूर्ण मराठवाडा विभागातून पर्यवेक्षक म्हणून उत्कृष्ट कामगिरी पार पाडल्याबद्दल श्री. गजानन साटोटे यांचा सत्कार करण्यात आला.

## सिडको प्रेसिडंट कप-सिडको क्रिकेट संघाचा दणदणीत विजय

सिडको प्रेसिडंट कपअंतर्गत झालेल्या सिडको विरुद्ध सेंडोज क्रिकेट क्लब, महाड यांच्यातील उद्‌घाटनाच्या सामन्यात सिडको संघाने विजयी सलामी दिली. सिडको संघाने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवलेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी स्वीकारून ४० षटकात



२५४ धावांचे लक्ष्य दिले. यामध्ये **श्री. एस. के. पाटील** याने नाबाद १०२ धावा तडकावल्या, तर **श्री. राहूल कडू** ३५, **श्री. कपिल कोळी** ३४ व **श्री. संतोष म्हात्रे** २० धावा करून त्यांना मोलाची साथ दिली. प्रत्युत्तरादाखल सेंडोज क्रिकेट क्लब २० षटकात ८८ धावा जमवू शकला. यामध्ये सिडको संघातर्फे **श्री. राजेश पाटील** यांनी ३ बळी तसेच **श्री. संतोष म्हात्रे** व **श्री. साठे** यांनी प्रत्येकी २ बळी घेऊन त्यांना गुंडाळले.

सिडको संघाने मिळविलेल्या या दणदणीत विजयासाठी त्यांचे **हार्दिक अभिनंदन.**

## सिडकोच्या महिला कर्मचाऱ्यांचा सावित्रीबाई फुले जयंती स्मरण व हळदीकुंकू समारंभ संपन्न

प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही **२५ जानेवारी, २०११ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.००** दरम्यान ७ वा मजल्यावरील सिडको सभागृहात सिडकोतील महिला अधिकारी-कर्मचारी यांच्याकरिता हळदीकुंकू समारंभ तसेच सवित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पूण्य स्मरणाच्या समारंभांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अनेक सांस्कृतिक उपक्रमांबरोबरच आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या स्मरणार्थ अनेक महिला कर्मचाऱ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

याप्रसंगी **श्रीमती धोडपकर** व **श्रीमती स्नेहल कडू** यांनी विचार मांडले. या समारंभाच्या यशस्वितेकरिता **श्रीमती मीनाक्षी तांडेल, श्रीमती विजया म्हात्रे,** तसेच **श्रीमती अनिता उरणकर** यांनी परिश्रम घेतले. सिडकोतील महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक **श्रीमती अमरजा चव्हाण** यांनी केले. तर **श्रीमती गायकवाड** यांनी सावित्रीबाई रचित ओवी गायन केले.

## सिडको वाहनचालक कर्मचाऱ्यांकरिता मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

सिडको वाहनचालक कर्मचाऱ्यांना वाहतुकीच्या नियमांचे बारकावे अवगत व्हावेत याकरिता, सीबीडी वाहतूक शाखेद्वारे **दि. ७ जानेवारी,२०११** रोजी मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कोकण भवनातील पाचव्या मजल्यावर पार पडलेल्या या कार्यशाळेत सीबीडी बेलापूर वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांनी संबंधित नियमांविषयी सखोल माहिती उपस्थित चालक कर्मचाऱ्यांना दिली. या कार्यशाळेतील यशस्वी सहभागाबद्दल **श्री. विनायक बी. सावंत, श्री. सोमनाथ जगदाळे** यांना पोलिस आयुक्त **श्री. दिवटे** यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या कार्यशाळेत **श्री. किसन एन. पाटील, श्री. प्रभाकर नारायण पाटील, श्री. बबन व्ही. भोईर, श्री. दिलीप जाधव, श्री. प्रितिन कोळी, श्री. किरण मढवी, श्री. अविनाश मढवी, श्री. अशोक पाटील, श्री. नितीन मुकादम, श्री. प्रफुल प्रकाश पाटील, श्री. पांडूरंग म्हात्रे, श्री. महेशकुमार शिंदे, श्री. घोरपडे, श्री. शर्मा** व **श्री. किशोर यादव** यांनी सहभाग घेतला.

### श्रद्धांजली



सिडको महामंडळातील सुरक्षा विभागात सुरक्षा रक्षक या पदावर कार्यरत असणारे **रफिक अली कुदरत अली काझी** यांचे **गुरुवार दि. १३ जानेवारी २०११** रोजी अल्पशः आजाराने निधन झाले.

त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी सिडको भवन प्रवेशद्वाराजवळ **दि. १४ जानेवारी २०११** रोजी **दुपारी १२.३० वा.** शोकसभा आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## निरोप समारंभ



**श्री. प्रविण पी. जोशी**



**श्री. अर्जुन दामोदर वले**

**श्री. प्रविण पी. जोशी** (अधिक्षक अभियंता) व **श्री. अर्जुन दामोदर वले,** (सुरक्षा रक्षक), हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ जानेवारी, २०११ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मुख्य संपादकः **डॉ. दिलीप वाटाणे,** जनसंपर्क अधिकारी, सिडको • मुद्रक व प्रकाशकः **डॉ. मोहन निनावे,** जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी). या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.